# कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्ग

## ''प्रकल्प परिसर'' अंतर्गत मुं.मे.रे.कॉ करणार २५,००० हून अधिक रोपटांचे वाटप

**मुंबई, २७ फेब्रुवारी, २०१७:-** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (मुं.मे.रे.कॉ) द्वारे ''प्रकल्प परिसर'' या हरित उपक्रमा अंतर्गत कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो-३ मार्गवरील प्रस्तावित २७ स्थानकांच्या परिसरातील विविध गृह निर्माण संस्था, शाळा व इस्पितळांमध्ये २५,००० हून अधिक वृक्षांची रोपटे वाटण्याची मोहिम राबविण्यात येणारआहे.

मुं.मे.रे.कॉला मेट्रो-३ प्रकल्पासाठी वृक्ष प्राधिकरणाने झाडे कापण्याकरिता परवानगी देतेवेळी भरपाई म्हणून जेवढ़ी झाडे लावण्याची सूचना केली आहे त्या व्यतिरिक्त मुं.मे.रे.कॉ. ''प्रकल्प परिसर'' अंतर्गत झाडे वाटप करणार आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाप्रमाणे मेट्रो-३ च्या प्रस्तावित २७ स्थानकांवर एकुण ३,८९१ झाडे असून त्यापैकी १,०७४ झाडे कापण्यास तर १,७२७ झाडांचे पुनर्रोपण करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. वृक्ष प्राधिकरणाच्या नियमावलीनुसार प्रत्येक कापल्या जाणाऱ्या झाडामागे ३ झाडे लावणे बंधनकारक असते, त्याप्रमाणे तोडल्या जाणाऱ्या झाडांची भरपाई म्हणून मुं.मेरे.कॉ. ३,००० झाडे लावणार आहे. भरपाई म्हणुन लावल्या जाणाऱ्या या ३००० झाडांव्यतिरिक्त मुं.मेरे.कॉ. हरित पुढ़ाकार म्हणून ''प्रकल्प परिसर''अंतर्गत प्रत्येक प्रस्तावित स्थानकांवर १००० रोपटांचे वाटप करणार आहे. मुं.मेरे.कॉ.चे कंत्राटदार रोपटांचे रोपण पर्यावरणीय बाबींची दखल घेत केले गेले की नाही याची खबरदारी घेतील. मेट्रो-३ प्रकल्पाच्या कामांकरिता तात्पुरत्या स्वरुपात घेण्यात येणा-या जमिनी व शासकीय मैदाने संबंधित विभागांना वृक्षारोपण करुन परत केले जाणार आहेत.

याविषयी प्रतिक्रिया देताना मुं.मेरे.कॉ.च्या व्यवस्थापकीय संचालक, श्रीमती अश्विनी भिडे म्हणाल्या की, मुं.मेरे.कॉ. राबवित असलेल्या सार्वजनिक वाहतूक प्रकल्पामुळे दररोज जवळपास ६.५ लाख वाहनाच्या फेऱ्या कमी होणार असून त्यामुळे कार्बनडाय ऑक्साईड सारख्या विषारी वायूचे प्रमाण देखील कमी होईल. भविष्यात पर्यावरणासाठी वरदान ठरणाऱ्या या प्रकल्पासाठी काही झाडांचे तात्पुरते नुकसान होणार असून ते नुकसान अपरिहार्य आहे व मुं.मे.रे.कॉला त्याचा खेद आहे. तरी मुं.मे.रे.कॉ होणाऱ्या नुकसानाची भरपाई वैज्ञानिक व व्यावसायिक दृष्टीकोन ठेऊन करणार आहे.

नागरिकांनी उपस्थित केलेल्या शंकांची दखल घेत कॉर्पोरेशनने ''प्रकल्प परिसर'' कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला आहे. मेट्रो-३ प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर जवळपास ६८०० टन कार्बनडाय ऑक्साईड तसेच इतर हरित गृह वायुंचे प्रमाण कमी होणार आहे. मुं.मेरे.कॉ.गुढ़ीपाडव्याचा शुभ मुहुर्तावर सदर प्रकल्पाची सुरुवात करणार आहे.